GKB Ophthalmics Ltd.
16-A, Tivim Industrial Estate, Mapusa, Goa 403 526 (INDIA)
CIN.: L26109GA1981PLC000469

Tel. : (91 832) 2257253 / 6714444
Fax : (91 832) 2257044
E-mail : gkbophthalmics@gkb.net
Website : www.gkb.net

GKB/ST-EXCH
August 19, 2020

Department of Corporate Services
BSE Limited
Phiroze Jeejubhoy Towers
Dalal Street
Mumbai - 400 001

Dear Sir,

**Ref : Scrip Code No. : 533212**
**Sub: Copies of newspaper cuttings of the Notice for Board Meeting ( Rescheduled).**

Please find attached copies of newspaper cuttings of the Notice for Board Meeting to be held on September 07, 2020, published in The Financial Express ( Mumbai Edition) and on Pudhari (Marathi) dated August 19, 2020.

Please acknowledge receipt.

Thanking you,

Yours faithfully,
For GKB Ophthalmics Ltd.

GKB OPHTHALMICS LIMITED MAPUSA GOA

Pooja Bicholkar
Company Secretary

हायटेक ड्रोन खरेदी केले आहेत. यामुळे रेल्वेच्या सुरक्षेत वाढ झाली असून मनुष्यबळाची देखील बचत होणार आहे. रेल्वे यार्डमध्ये कोच, वॅगनमध्ये चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन चोरट्यांना या ड्रोनच्या माध्यमातून पकडण्यात आले.

# राज्यात पावसाचा जोर ओसरला

पणजी : पुढारी वृत्तसेवा

राज्यात गेल्या आठवड्यात पडलेल्या जोरदार पावसानंतर आता पावसाचा जोर कमी झाला आहे. मंगळवारी काही ठिकाणी दिवसभर कडक ऊन पडले होते. संध्याकाळी पावसाच्या हलक्या सरींनी हजेरी लावली. मंगळवारी १७.२ मिमी पावसाने हजेरी लावली. पुढील काही दिवस राज्यात मध्यम ते तूरळक प्रमाणात पावसाची शक्यता आहे, अशी माहिती गोवा वेधशाळेने दिली.

मंगळवारी म्हापसा, फोंडा व केपे भागात मध्यम तर पेडणे, साखळी, सांगे व अन्य भागात तूरळक सरींनी हजेरी लावली. म्हापसा, फोंडा व केपे येथे प्रत्येकी ३ सें.मी. तर पेडणे, साखळी, सांगे येथे प्रत्येकी २ सें.मी. इतका पाऊस पडला. तसेच पणजी, एला (जुने गोवे) काणकोण व दाबोळी भागात प्रत्येकी १ सें.मी. इतक्या पावसाने हजेरी लावली.

मंगळवारी दिवसभर ऊन पडले असले तरी तापमान मात्र कमीच होते. पणजीत कमाल तापमान २९.२ अंश सेल्सियस इतके घटले होते तर किमान तापमान २४.७ अंश सेल्सिअस इतके नोंद झाले. तसेच मुरगावात कमाल तापमान ३०.७ तर किमान तापमान २३.८ अंश सेल्सिअस इतके होते. राज्यात पुढील २४ तासात तापमानात काही अंशांनी वाढ शक्य असून कमाल तापमान ३१ अंशांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

# झव्हेरी काँग्रेस नेत्यांच्य

## चोडणकरांनी खुलासा करावा; भाजप प्रवक्ते दत्त

पणजी : पुढारी वृत्तसेवा


वागातोर येथील रेव्ह पार्टीत पकडण्यात आलेल्या कपिल झव्हेरी याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, खासदार विनय तेंडूलकर व अन्य भाजप मंत्री- आमदारांसोबतचे फोटो दाखवून चोडणकर यांनी लोकांना चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. मात्र, झव्हेरी यांच्या बँकेचे उद्घाटन विद्यमान विरोधी पक्षनेते दिगंबर कामत यांनी केले असून त्याच्या संपर्कात काँग्रेसचे अनेक नेतेही आले आहेत. याचा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गिरीश चोडणकर यांनी खुलासा करावा , अशी मागणी भाजपचे प्रवक्ते दत्तप्रसाद नाईक यांनी मंगळवारी भाजप मुख्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

दत्तप्रसाद नाईक म्हणाले, की वागातोर येथील रेव्ह पार्टीत पकडण्यात आलेल्या कपील झव्हेरी याने मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून अधिकृत भेटीची वेळ ठरवून मुख्यमंत्री सावंत यांची सदिच्छा भेट घेतली होती.त्यावेळी तत्कालीन भाजप प्रदेशाध्यक्ष तथा खासदार तेंडूलकर हेही हजर होते. भाजपचे कुठलेच मंत्री वा आमदार झव्हेरी याच्या सहकारी बँकेत कधीही गेले नव्हते.मात्र, त्याच्या बँकेचे उद्घाटन काँग्रेसचे

# हिटमॅन रोहितची राजीव गांधी खेलरत्न पुरस्कारासाठी शिफारस

## फोगाट, बत्रा, थंगवेलू यांचीही शिफारस

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा



भारतीय क्रिकेट संघाचा सलामीवीर हिटमॅन रोहित शर्मा, महिला कुस्तीपटू विनेश फोगाट, टेबल टेनिसपटू मनिका बत्रा आणि पॅरालिम्पिकपटू एम. थंगवेलू यांच्या नावाची यंदाच्या राजीव गांधी खेलरत्न पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे.

रोहित शर्माची जर या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड झाली, तर तो हा पुरस्कार पटकावणारा चौथा क्रिकेटर ठरणार आहे. या शिफारशीला क्रीडा मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर निवडण्यात आलेल्या खेळाडूंना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त म्हणजे २९ ऑगस्ट रोजी हा पुरस्कार प्रदान केला जातो. यापूर्वी, सचिन तेंडुलकर (१९९८), माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी (२००७) व कर्णधार विराट कोहली (२०१८) यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# रत्नागिरी जिल्ह्यात ३ हजारांवर बाधित

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

जिल्ह्यात कोरोनाबाधितांचा आकडा सातत्याने वाढत असून, जिल्हा प्रशासनाने स्वॅब तपासणी ऐवजी आता अँटिजेन चाचण्यांवर भर दिला आहे. अँटिजेन चाचणीचा अहवाल अवघ्या काही मिनिटांत मिळत असल्याने बाधित रुग्णांवर लवकर उपचार करणे शक्य झाले आहे. दरम्यान, मागील २४ तासांत जिल्ह्यात ७३ नवे रुग्ण सापडल्याने बाधितांचा आकडा तीन हजार पार जाताना ३०१८ वर पोहोचला आहे. दरम्यान, कोरोनामुळे मंगळवारी दोन तरुणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १०७ जणांचा कोरोनाने मृत्यू झाला आहे.

# सिंधुदुर्गात दोन बळी, नवे १८ पॉझिटिव्ह

ओरोस : पुढारी वृत्तसेवा

जिल्ह्यात मंगळवारी ४५६ कोरोनाबाधित रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. सद्य:स्थितीत जिल्ह्यात २०६ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. जिल्ह्यात मंगळवारी आणखी १८ व्यक्तींचे कोरोना तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत तर मालवण तालुक्यातील एका १७ वर्षीय मुलाचा सोमवारी व खारेपाटण परिसरातील एकाचा मंगळवारी मृत्यू झाला, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी दिली. दरम्यान, जिल्ह्यात कोरोनामुळे मृत झालेल्यांची संख्या १४ वर पोहोचली आहे.


**Classifieds**

छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद

**व्यवसाय**

**ट्युब बल्ब बनविण्याची** एजन्सी देणे. गुंतवणूक ३५/-ह. सुर्या कं. पुणे. संपर्क- ९१६८३८०८२६, ७०२८७६८०४८.

**कर्ज**

**नॅशनल फायनान्स कंपनी** सर्व लोन २% व्या. ३०% सू. घरबसल्या. स्त्रियांना विशेष सूट. ९२७५५०१९३२.

**कुबेर फायनान्स सर्व** योजना पर्सनल सर्व लोन व्याज २% सूट ४०% स्त्रियांना विशेष सूट. ७४२९७७९१६२.



**वाचकांसाठी निवेदन**

पुढारी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे याची पुढारी पब्लिकेशन्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी पुढारी पब्लिकेशन्स प्रा. लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



GKB

**जीकेबी ऑफ्थॅल्मिक्स लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय पत्ता : १६-ए, थिवी औद्योगिक वसाहत, म्हापसा गोवा. ४०३ ५२६

CIN:L26109GA1981PLC000469

फोन : (०८३२) - २२५७२५३/६७१४४४४, फॅक्स : क्र. (०८३२) २२५७०४४,

ई -मेल : gkbophthalmics@gkb.net संकेतस्थळ : www.gkb.net

**नोटीस**

सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ सह वाचता रेग्युलेशन २९ च्या अनुषंगाने याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, ३० जून २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिता, कंपनीचे अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्ष रेकॉर्डवर घेण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवार दि. १९ ऑगस्ट २०२० रोजी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात आयोजित करण्यात आलेली होती ती सोमवार दि. ०७ सप्टेंबर २०२० रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

नोटीस कंपनीची संकेतस्थळ www.gkb.net आणि बीएसई लिमिटेडची संकेतस्थळ : www.bseindia.com येथे देखील पाहता येईल

जेकेबी ऑफ्थल्मिक्स लिमिटेड

सही

ठिकाण : म्हापसा -गोवा

दिनांक : १८ ऑगस्ट २०२०

पूजा डिचोलकर

कंपनी सचिव


Pudhari - 19/8/2020